CMYK

बीड । शुक्रवार

०४.०७.२०२५

वर्षे : ५ अंक : ९४

किंमत : ३ रू. पाने : ४

दैनिक • https://marathwadapatra.com

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■




dailymarathwadapatra2021@gmail.com RNI:Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post:Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 Mob:9822152955 

# मराठीवरून मविआत फूट? कॉंग्रेसला बोलावले नाही, आता ठाकरेंच्या मेळाव्याला शरद पवार जाणार नाहीत

**मुंबई । प्रतिनिधी**

हिंदी भाषेच्या मुद्दयावरून राज्यात वातावरण तापलेले पाहायला मिळत आहे. पहिली पासून हिंदीची सक्ती नको, अशी भूमिका राज्यातील अनेक संघटना आणि विरोधी पक्षांची होती.

याच मुद्दयावरून शिवसेना ठाकरे गट आणि मनसे एकत्रित येऊन मोर्चा काढणार होते. परंतु, त्यापूर्वीच सरकारकडून त्रिभाषा सूत्राचे दोन्ही जीआर रद्द करण्यात आले. मात्र आता त्याच दिवशी ठाकरे बंधू एकत्र येऊन विजयी मेळावा



साजरा करणार आहेत. यावरून महाविकास आघाडीत बिघाड झाल्याचे पाहायला मिळत आहे. या मेळाव्याचे निमंत्रण कॉंग्रेसला देण्यात आलेले नसून, ठाकरे बंधूंच्या विजयी मेळाव्याला आता शरद पवारही जाणार नाहीत, हे स्पष्ट झाले आहे. ५ जुलेच्या ठाकरे बंधूंच्या विजयी मेळाव्याचे निमंत्रण कॉंग्रेसला मिळाले नसल्याचे म्हटले जात आहे. आम्हाला अजून तसे काही निमंत्रण मिळालेले नाही किंवा सांगण्यात आलेले नाही. कदाचित हे राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांचा इव्हेंट असू शकतो. ५ जुलै हा मोर्चा काढण्यासाठी दिवस ठरला होता. पण हा जीआर रद्द झाला आहे असे मला अजूनही वाटत नाही. कारण नरेंद्र जाधव समिती नेमली आहे. त्यामुळे मुंह में राम बगल में नथुराम या भाजपाच्या नितीपासून जपून राहणे आवश्यक आहे. ५ जुतेचा दिवस मराठी लोक साजरा करतील, त्यांना आमच्या शुभेच्छा आहेत. अशी प्रतिक्रिया कॉंग्रेस नेते अतुल लोंढे यांनी दिली होती. यानंतर आता शरद पवार हेही ठाकरे बंधूंच्या कार्यक्रमाला हजर राहणार नाहीत. तुम्ही या मेळाव्याला जाणार का? शरद पवार म्हणाले....

पत्रकारांशी संवाद साधत असताना शरद पवार यांना यासंदर्भात प्रतिक्रिया विचारण्यात आली. मराठीच्या मुद्दयावर ०५ जुलै रोजी ठाकरे बंधू एकत्र येऊन विजयी मेळावा घेत आहेत. यात तुमचा पक्ष सहभागी असणार का, असा प्रश्न शरद पवार यांना विचारण्यात आला. यावर बोलताना, ठाकरे बंधूंच्या मेळाव्याबाबत माहिती नाही. आमच्या पक्षाचे अध्यक्ष जयंत पाटील हे काल मला भेटले होते. ते म्हणाले होते की, ▶▶ उर्वरित पान २ वर

# सहा महिन्यात पोलिसांच्या कामगिरीचा आलेख उंचावला

- **जिल्हा पोलीस अधीक्षक नवनीत कॉंवत यांनी जे बोलले ते करून दाखवले !**
- **अवैद्य धंदे, गुन्हेगारी, माफियागिरी करणाऱ्यांचे कंबरडे मोडले !**
- **सहा महिन्यात तब्बल तेरा कोटी ७८ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त !**

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यात गेल्या सहा महिन्यात पोलीस अधीक्षक नवनीत कॉंवत यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यातील पोलीस विभागाने गुन्हेगारी व अवैध धंद्याविरोधात राबवलेल्या मोहिमात गुन्हेगारी कमी व अवैध धंदे चालकांचे कंबरच मोडले आहे विशेष म्हणजे गुटखा वाळू गांजा यासारख्या तस्करी करणाऱ्या माफी यांच्या मुस्क्या आवळल्या तर सर्वसामान्य नागरिकांसाठी पोलीस विभाग काय करू शकतो हे दाखवून दिले. आठवड्यात प्रत्येक बुधवारी पोलिसांकडून जनता दरबाराचे आयोजन करण्यात येते. यामध्ये नागरिक व्यापारी यासह सर्वसामान्य नागरिकांना आपल्या तक्रारी अधिकाऱ्यांकडे मांडता येतात. यासह थेट जिल्हा पोलीस अधीक्षकांना घटनेची व तक्रार करायची असेल तर क्यू आर कोड च्या माध्यमाने करता येते. यातच शेतकऱ्यांचे आपसात शेत रस्ता व बांधावरून गंभीर स्वरूपाचे भांडणे होतात ते सोडवण्यासाठी पोलीस आपल्या बांधावर उपक्रम राबवत अनेक ठिकाणी भांडणाचे समाधान बांधावरच करण्यात आले. बीड जिल्ह्यातील गुन्हेगारी कमी करण्याच्या उद्देशाने जिल्हा पोलीस अधीक्षक आणि रबवलेले विविध उपक्रम समाज उपयोगी पडत आहेत. जिल्हा पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी जे बोलले ते सहा महिन्यात करून दाखवले.

बीड जिल्हयातील वाढलेल्या गुन्हेगारीस आळा बसवण्यासाठी बीड पोलीसांनी कायदेशीर कारवाया करून सर्वोतोपरी प्रयत्न करण्यात येत आहेत.

बीड जिल्हयातील माहे ०६/२०२४ अखेर व माहे ०६/२०२५ अखेर दाखल गुन्हयांचा आढावा घेतला असता



खुन या सदराखाली एकुण (७) गुन्हयांची घट झालेली असून सन २०२५ मध्ये एकुण १५ खुन दाखल असून सर्व गुन्हे उघड आहेत. खुनाचा प्रयत्न या सदराखाली एकुण (२३) गुन्हयांची घट झालेली आहे.

दरोडा या सदराखाली एकुण (३) गुन्हयांची घट झालेली असून सन २०२५ मध्ये एकुण ५ दरोडा दाखल असून सर्व गुन्हे उघड आहेत.जबरी चोरी या सदराखाली माहे ०६/२०२४ अखेर गुन्हे उघडकीसचे प्रमाण (६४%) होते माहे ०६/२०२५ अखेर गुन्हे उघडकीसचे प्रमाण (६९%) झालेले आहेबलात्कार या सदराखाली एकुण गुन्हयांची घट झालेली आहे. अवैध दारू (१०४१) केसेसमध्ये ▶▶ उर्वरित पान २ वर

## आषाढी एकादशीला भाविकांची कसलीही गैरसोय होऊ नये: आ.संदीप क्षीरसागर

**पोलीस, आरोग्य, एस.टी., महावितरण विभागाला दिल्या सूचना**

**बीड । प्रतिनिधी**

आषाढी एकादशी या महाराष्ट्रातील वारकरी सांप्रदायाच्या सर्वात मोठ्या महोत्सवाच्या वेळी भाविकांची गैरसोय टाळण्यासाठी प्रशासनाने उपाययोजना कराव्यात आणि काळजी घ्यावी. अशा सूचना आ.संदीप क्षीरसागर यांनी प्रशासनाला दिल्या आहेत.

रविवारी (दि.६ जुलै २०२५) रोजी आषाढी एकादशी आहे. एकादशीच्या निमित्त, बीड तालुक्यात असलेल्या धाकटी पंढरी श्री क्षेत्र नारायणगड येथे



संपूर्ण बीड जिल्ह्यातून भाविक येतात. तसेच बीड जिल्ह्यातून अनेक भाविक पंढरपुरला जातात. या अनुषंगाने भाविकांची गैरसोय टाळण्यासाठी आ.संदीप ▶▶ उर्वरित पान २ वर

# जिल्ह्यात पान टपरी पेक्षा अनाधिकृत इंग्लिश स्कूल जास्त

- **बीड मध्ये अनाधिकृत शाळांवर कारवाई होणार का? - मनोज जाधव**
- **शाळा तपासून अनाधिकृत शाळांची माहिती शिक्षण विभागाने मागवली**

**बीड । प्रतिनिधी**

राज्यातील अनाधिकृत शाळांबाबतची माहिती सादर करण्याबाबत शिक्षण संचालनालयाने आदेश निर्गमित केले असून आता जिल्ह्यात अनाधिकृत शाळा आढळुन आल्यास सदरिल शाळेवर शासन निर्णय दि.१८ डिसेंबर २०२३ नुसार कार्यवाही करण्याबाबत सूचित केलेले आहे. अनाधिकृत शाळांची माहिती शिक्षण विस्तार अधिकारी व केंद्रप्रमुख यांचेकडुन त्यांचे बीट/केंद्र मधील शाळांना प्रत्यक्ष भेट देऊन त्यांचे जियो टॅग फोटो काढणे आणि विहित प्रपत्रात माहिती भरुन तात्काळ ०७ जुलै पर्यंत सदरिल माहिती व अहवाल सादर करण्याचे आदेश शिक्षण विभागाने दिले आहेत. मात्र जिल्ह्यात पान टपरी पेक्षा अनाधिकृत इंग्लिश स्कूल आणि इतर शाळा जास्त आहेत. तेव्हा शिक्षण ▶▶ उर्वरित पान २ वर



## लोकप्रतिनिधींनी कार्यकर्त्यांना वाटलेल्या कामांच्या 'रेवड्या' पैकी लोकप्रतिनिधींनी सुचवलेल्या 185 कामांचा 'श्रीगणेशा' सुद्धा नाही

**बीड । प्रतिनिधी**

ग्रामीण भागातील विकासासाठी लोकप्रतिनिधी कामे सुचवित असतात.यात २५१५,१२३८ या योजनांमधून मराठवाड्यात गतवर्षी २६२८ कामांना मंजुरी मिळाली त्यातील १३३४ कामे कागदावर प्रगतीपथावर आहेत मात्र मंजुरीनंतर कामे पूर्ण करण्याकडे लोकप्रतिनिधी



आणि कंत्राटदार दोघांनीही डोकावून पाहिले नाही त्यामुळे वर्षं उलटुनही मंजुर कामांपैकी १८५ कामांसाठी उद्धाटनाचा नारळ फोडलेला नाही त्यामुळे लोकप्रतिनिधींनी कार्यकर्त्यांना वाटलेल्या कामाच्या रेवड्या तशाच असुन मंजूर कामापैकी १८५ कामांचा श्रीगणेशा सुद्धा झालेला नसल्याचे आढळून आले आहे. आता येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत पुन्हा या कामांच्या रेवड्या वाटल्या जाणार का? असा सवाल सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी उपस्थित केला असुन बीड जिल्ह्यात सर्वाधिक १२१४ कामांचा समावेश असुन मंजूर केलेली कामे वेळेत पूर्ण होताना दिसत नाहीत त्यामुळे लोकप्रतिनिधी आणि कंत्राटदार यांनी मंजुर कामे तातडीने पूर्ण करण्यात यावीत अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. १५१५ ▶▶ उर्वरित पान २ वर

## सार्वजनिक शांतता भंग करणाऱ्या आरोपीस न्यायालयीन कोठडी

**बीड । प्रतिनिधी**

विशेष कार्यकारी दंडाधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, बीड यांच्या आदेशानुसार, एक रिमांड वॉरंट जारी करण्यात आले आहे. सदर वॉरंट बीएनएसएस कलम १२९ अंतर्गत करण्यात आलेल्या आरोपांप्रकरणी आहे.

आरोपी उद्धव शिवाजी जाधव, वय ४६ वर्ष, रा. कुंभारवाडी, ता. गेवराई, जि. बीड यांचेविरुद्ध गेवराई पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल आहे. त्याने पुन्हा गुन्हा करुन सार्वजनिक शांततेचा भंग करु नये म्हणुन त्याचेवर तहसील कार्यालय गेवराई येथे इछडड कलम १२६ प्रमाणे प्रतिबंधक कारवाई करण्यात आली होती. त्याच्या वर्तनात सुधारणा होत नव्हती. त्याचे विरुद्ध पुन्हा गुन्हा दाखल झाल्याने त्यांचेविरुध्द BNSS कलम १४१(ब) अंतर्गत तहसील कार्यालय गेवराई येथे प्रतिबंधक कारवाई करुन त्याचकडून रोख रक्कम ▶▶ उर्वरित पान २ वर

## अंबाजोगाईच्या ऊसतोड मजुराच्या मुलाचा आंतरराष्ट्रीय एशियन चॅम्पियन शिपमध्ये यशस्वी डंका

**राजकिशोर मोदी यांच्या वतीने आदित्यच्या यशाचा सन्मान**



**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

अंबाजोगाई शहरातील मंगळवार पेठ भागातील रहिवाशी असलेल्या ऊसतोड कामगाराचा मुलगा चि. आदित्य दिलीप जाधव (वय १७) या तरुणाने एशियन चॅम्पियन शिप मध्ये रौप्यपदक पटकावत आपल्या उल्लेखनीय कामगिरीने अंबाजोगाई शहरासह संपूर्ण भारत देशाची मान ▶▶ उर्वरित पान २ वर




## सराईत चोरटा पकडला सहा दुचाकी जप्त

**बीड । प्रतिनिधी**

स्थानिक गुन्हे शाखेने तेलगाव रोडवर सापळा लावून सराईत दुचाकी चोर पकडला असून, त्याच्या ताब्यातून चोरीच्या सहा दुचाकी किंमत ३ लाख ५० हजारांचा मुद्देमाल जप्त केला. यामध्ये ५ दुचाकी या शिवाजीनगर पोलीस ठाणे हद्दीतून चोरी झालेल्या असल्याचे गुन्हे उघडकीस आले. बीड शहरासह जिल्ह्यात दुचाकी चोरीच्या घटना थांबण्याचे नाव घेत नसल्याने या गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी आदेश दिले आहेत. यामुळे स्थानिक गुन्हे शाखेच्या रडावर दुचाकी चोर असून याचा तपास करताना ▶▶ उर्वरित पान २ वर

# केज मध्ये गतिमंद तरुणीवर बलात्कार नराधम नानासाहेब चौरे अटक

**आरोपी निघाला वाल्मीक कराड समर्थक ; केज पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद**

**बीड । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील केज तालुक्यात घडलेली ही संतापजनक घटना संपूर्ण राज्याला हादरवून टाकणारी आहे. गतिमंद तरुणीवर लैंगिक अत्याचार केल्याप्रकरणी नानासाहेब चौरे या नराधमाला पोलिसांनी अटक केली असून त्याच्यावर केज पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

विशेष म्हणजे, चौरे याचं नाव यापूर्वीही



चर्चेत आलं होतं. कारण तो वाल्मिक कराडवरील गुन्हे मागे घ्यावेत म्हणून पाण्याच्या टाकीवर चढून आंदोलन करणारा कार्यकर्ता होता. ही घटना २ जून रोजी घडली. पीडित तरुणी आपल्या नातेवाईक महिलेसोबत आरोग्य उपकेंद्रात जात होती. उपकेंद्राजवळ एका ठिकाणी थांबलेल्या तरुणीवर, तिची साथ असलेली महिला आत गेल्यावर, चौरेने अत्याचार केला. त्यानंतर पीडितेच्या नातेवाईक महिलेला धमकावून गप्प राहण्यास सांगितलं. घटनेनंतर लगेचच पोलिसांकडे तक्रार दाखल झाली.

केज पोलिसांनी तत्काळ कारवाई करत आरोपी नानासाहेब चौरेला अटक केली आहे. त्याच्यावर बलात्कार, जबरदस्ती व धमकावणे या संबंधित कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सध्या ▶▶ उर्वरित पान २ वर




CMYK

# प्लास्टिक प्रदूषणामुळे समस्त जीवसृष्टीवर ओढवले संकट

जगात करण्यात आलेले सर्व शोध मानवजातीच्या विकासासाठी केले गेले, पण मानवाने आपल्या गरजांच्या मर्यादा तोडल्या आणि आपल्या स्वार्थ, लालसेप्रमाणे वागू लागले, परिणामी स्वतःसाठी तसेच संपूर्ण जगासाठी विनाशाचा रणशिंग फुंकला. असेच प्लास्टिक प्रदूषण आज आपल्या पृथ्वीसाठी एक मोठी समस्या बनले आहे. जमीन असो, आकाश, पाणी किंवा हवा असो, संपूर्ण वातावरणात प्लास्टिक प्रदूषणाने जीवनाला धोका निर्माण केला आहे आणि हा धोका वेगाने प्राणघातक पातळीवर वाढत आहे, तरीही लोक हे समजून घेण्यास तयार नाहीत. आपण अनेकदा पाहतो की विशिष्ट प्लास्टिक पिशव्या आणि इतर प्लास्टिक साहित्यांवर बंदी असूनही, त्यांचा वापर बेकायदेशीरपणे केला जात आहे. प्लास्टिक प्रदूषण जीवनचक्र विस्कळीत करून फार नुकसान करत आहे. या समस्येचे गांभीर्य समजून घेण्यासाठी, दरवर्षी ३ जुलै रोजी आंतरराष्ट्रीय प्लास्टिक पिशवी मुक्त दिन साजरा केला जातो. या वर्षी २०२५ ची थीम एकदा वापरल्या जाणाऱ्या प्लास्टिक पिशव्यांचा वापर कमी करा आणि शाश्वत पर्यायांना प्रोत्साहन द्या आहे. ही थीम डिस्पोजेबल प्लास्टिक पिशव्यांची समस्या संपवण्याच्या गरजेवर भर देते आणि पुन्हा वापरता येण्याजोग्या पर्यायांचा अवलंब करण्यास प्रोत्साहित करते. प्लास्टिक प्रदूषणाच्या पर्यावरणीय परिणामांबद्दल जागरूकता निर्माण करणे आणि प्लास्टिकमुक्त भविष्यासाठी कृती करण्यास प्रेरणा देणे हे देखील या मोहिमेचे उद्दिष्ट आहे.

संयुक्त राष्ट्रांच्या पर्यावरण कार्यक्रमानुसार, दरवर्षी ४६० दशलक्ष मेट्रिक टनांपेक्षा जास्त प्लास्टिकचे उत्पादन होते. बांधकामापासून वाहनांपर्यंत, इलेक्ट्रॉनिक्स ते शेतीपर्यंत, जवळजवळ सर्व औद्योगिक उपक्रमांमध्ये आणि सर्व ग्राहकांद्वारे प्लास्टिकचा वापर केला जातो. २०१९ मध्ये पर्यावरणातील एकूण जागतिक प्लास्टिक कचऱ्यापैकी ८८ टक्के, किंवा अंदाजे २० दशलक्ष मेट्रिक टन, मॅक्रोप्लास्टिक्स होते, जे सर्व परिसंस्थांना प्रदूषित करतात. जगातील बहुतेक प्लास्टिक प्रदूषण हे बाटल्या, टोप्या, शॉपिंग बॅग, कप, स्ट्रॉ यासारख्या एकदा वापरल्या जाणाऱ्या उत्पादनांमधून होते. दररोज २००० ट्रक प्लास्टिक कचरा जगातील महासागर, नद्या आणि तलावांमध्ये टाकला जातो. यूएनईपी २०२५ नुसार, आतापर्यंत उत्पादित झालेल्या प्लास्टिकपैकी फक्त ९ टक्के प्लास्टिकचा पुनर्वापर म्हणजे रिसायकल करण्यात आला आहे. ईएमएफ २०१६ नुसार, २०५० पर्यंत समुद्रात माशांपेक्षा जास्त प्लास्टिक असू शकते. यूके सरकारच्या २०१८ च्या अहवालानुसार, सागरी प्लास्टिक प्रदूषणामुळे दरवर्षी १,००,००० हून अधिक सागरी सस्तन प्राणी आणि दहा लाख समुद्री पक्षी मृत्युमुखी पडतात. सर्व समुद्री कचऱ्यापैकी ८० टक्के हे प्लास्टिक आहे. प्लास्टिक हा एक न विघटनशील कचरा आहे जो हजार वर्षांपर्यंत टिकू शकतो. १९५० पासून जगभरात ९.२ अब्ज टनांपेक्षा जास्त प्लास्टिक तयार झाले आहे, त्यापैकी सुमारे ७ अब्ज टन कचरा म्हणून टाकून देण्यात आला आहे. गेल्या चार दशकांत जागतिक प्लास्टिक कचऱ्याचे उत्पादन सात पटीने वाढले आहे असे स्टेटिस्टा दाखवते. आशिया हा असा प्रदेश आहे जो सर्वात जास्त अनियंत्रित प्लास्टिक कचरा निर्माण करतो, जो जागतिक एकूण कचऱ्यापैकी ६५ टक्के आहे.

आपल्या अन्नातून, पिण्याच्या पाण्यातून आणि श्वास घेत असलेल्या ऑक्सिजनमधूनही प्लास्टिकचे प्रदूषण आपल्या शरीरात प्रवेश करते. सौर किरणे, वारा, प्रवाह आणि इतर नैसर्गिक घटकांमुळे प्लास्टिकचे सूक्ष्म प्लास्टिक आणि नॅनोप्लास्टिक्समध्ये विघटन होते. नॅनोप्लास्टिक्स शरीरात सहजपणे प्रवेश करू शकतात. आपल्या हृदयात, फुफ्फुसात, यकृतात, प्लीहामध्ये, मूत्रपिंडात आणि मेंदूमध्येही सूक्ष्म प्लास्टिक आढळले आहे आणि अलीकडील एका अभ्यासात नवजात मुलांच्या प्लेसेंटामध्ये सूक्ष्म प्लास्टिक आढळून आले आहे. प्लास्टिकमधून बाहेर पडणारी किमान ४,२१९ रसायने चिंतेचा विषय आहेत. समुद्रात २४ ट्रिलियन सूक्ष्म प्लास्टिकच्या तुकड्यांसह, सागरी जीव बहुतेकदा प्लास्टिकचे सेवन करतात. जेव्हा मानव सागरी जीव खातात तेव्हा ते प्लास्टिक मानवी शरीरात प्रवेश करते. संशोधकांचा अंदाज आहे की सरासरी व्यक्ती दरवर्षी समुद्री खाद्यपदार्थांमधून सुमारे ५३,८६४ सूक्ष्म प्लास्टिक कण खातो.

भारतात दरडोई प्लास्टिकचा वापर दरवर्षी अंदाजे ११ किलोपर्यंत वाढला आहे आणि तो वाढतच राहण्याची शक्यता आहे. दरवर्षी ५.८ दशलक्ष टनांहून अधिक प्लास्टिक कचरा जाळला जातो, ज्यामुळे हवेत डायऑक्सिनसह अनेक हानिकारक प्रदूषक सोडले जातात, ज्यामुळे श्वसनाचे आजार होतात आणि कर्करोगाचा धोका वाढतो. फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीनुसार, प्लास्टिक कचऱ्याचे योग्य संकलन न केल्यास २०३० पर्यंत भारताला १३३ अब्ज अमेरिकन डॉलर्सपेक्षा जास्त भौतिक मूल्याचे नुकसान होऊ शकते. नेचरमध्ये प्रकाशित झालेल्या एका अभ्यासातून असे दिसून आले आहे की, भारत प्लास्टिक प्रदूषणात जगातील सर्वात मोठा वाटा देणारा देश बनला आहे, जो एकूण जागतिक प्लास्टिक कचऱ्याच्या जवळपास २० टक्के आहे. भारत दरवर्षी ९.३ दशलक्ष टन प्लास्टिक कचरा निर्माण करतो, जो पर्यावरण प्रदूषणाच्या बाबतीत जगातील इतर कोणत्याही प्रदेशापेक्षा जास्त आहे. भारताचा अधिकृत कचरा संकलन दर ९५ टक्के आहे, तर संशोधनातून असे दिसून आले आहे की प्रत्यक्ष दर ८१ टक्के आहे. अलीकडील आकडेवारीवरून असे दिसून आले आहे की, भारतातील दररोजच्या प्लास्टिक कचऱ्यापैकी फक्त ८-१० टक्के रिसायकल केला जातो, उर्वरित जाळला जातो किंवा लँडफिल आणि जलमार्गांमध्ये टाकला जातो.

प्लास्टिक पिशव्यांमुळे प्राण्यांचा मृत्यू होतो, ते जैविकरित्या विघटित होत नाहीत, प्लास्टिक पिशव्या पेट्रोलियम उत्पादनांपासून बनवल्या जातात, त्यांच्या उत्पादनादरम्यान विषारी रसायने सोडली जातात. प्लास्टिक अन्न साठवणुकीच्या पॅकेजेसमध्ये विषारी रसायने असतात. प्लास्टिक पिशव्यांचे मोठे संचय अनेकदा ड्रेनेज सिस्टममध्ये अडथळा आणतात. प्लास्टिक पिशव्यांमुळे मुलांमध्ये फुफ्फुसांच्या गुंतागुंतीचा धोका वाढतो आणि महिलांमध्ये प्रजनन क्षमतेवर परिणाम होऊ शकतो, तसेच प्लास्टिकमुळे पुरुषांमध्ये प्रोस्टेट कर्करोगाचा धोका देखील वाढू शकतो. प्लास्टिक पिशव्या भूजल प्रदूषित करतात, प्लास्टिक प्रदूषणामुळे नैसर्गिक अन्नसाखळी विस्कळीत होते. प्लास्टिक पिशव्यांच्या उत्पादनात भरपूर पाणी वापरले जाते. अज्ञान म्हणा किंवा निष्काळजीपणा, लोक गरम अन्नपदार्थ पॅक करण्यासाठी प्लास्टिकच्या कॅरी बॅगचा वापर करतात. आपण आपल्या आजूबाजूला पाहतो की लोक लहान-लहान कॅरी बॅगमध्ये गरम पेये, चहा, कॉफी घेऊन जातात. अनेक हॉटेल, रेस्टॉरंट किंवा रस्त्यावर स्ट्रीट फूड, नाश्ता, अन्न देखील प्लास्टिकच्या प्लेटमध्ये खाल्ले जाते किंवा प्लास्टिकच्या कॅरी बॅग पार्सल म्हणून वापरल्या जातात, जे आरोग्यासाठी खूप हानिकारक आहे. प्लास्टिकच्या पिशव्यांमध्ये गरम अन्न किंवा खाद्य ठेवणे हे विषासारखे आहे, कारण गरम अन्नपदार्थ प्लास्टिकच्या संपर्कात येताच रासायनिक प्रक्रिया सुरू करतात. प्लास्टिक गरम होताच, त्यातून बाहेर पडणारे हानिकारक रसायने अन्नपदार्थांमध्ये शोषले जातात आणि ते अन्न सेवन करून माणूस थेट प्राणघातक आजारांना आमंत्रण देतो. हे सर्व माहित असूनही, देशात अन्नपदार्थांसाठी प्लास्टिकचा वापर मोठ्या प्रमाणात केला जातो.

ग्राहकांच्या मागणी पूर्ण करण्यासाठी प्लास्टिकचे उत्पादन केले जाते, जर आपण ग्राहक प्लास्टिकपासून दूर राहिलो तर ही समस्या बऱ्याच प्रमाणात दूर होऊ शकते. प्लास्टिकला इतर पर्यायांचा अवलंब, पर्यावरण वाचवण्यासाठी जागरूकता आणि आपली प्रबळ इच्छाशक्ती आवश्यक आहे. सर्वप्रथम, आपला स्वार्थ आणि आळस सोडून द्या, सरकारी धोरणे आणि नियमांचे काटेकोरपणे पालन करा. मग प्लास्टिकला शक्य असलेले पर्याय स्वीकारा. वापरा आणि फेकून द्या सारख्या वस्तूंना नाही म्हणा. प्लास्टिकच्या पिशव्या पूर्णपणे विसरून जा, अन्नपदार्थांच्या पॅकेजिंगमध्ये प्लास्टिक वापरणे टाळा. आज प्लास्टिक ही सोय आहे पण आयुष्यभरासाठी धोका आहे, हे समजून घ्या. पर्यावरण आपल्याला चांगले जीवन देण्यासाठी आहे, जर आपण आपले पर्यावरण नष्ट केले तर पर्यावरण आपल्याला देखील नष्ट करेल. याचे गांभीर्य समजून घ्या आणि जागरूक नागरिकाचे कर्तव्य बजावा.

**लेखक – डॉ. प्रीतम भी. गेडाम**

पान १ वरून पुढे...

## मराठीवरून मविआत...

या सगळ्या कामात आम्ही सहभागी होणार आहोत. त्यामुळे पक्षाच्या अध्यक्षांचा निर्णय हा आम्हाला शिरसावंद्य असतो, असे शरद पवार यांनी सांगितले. तुम्ही या मेळाव्याला जाणार का, असा प्रश्न पत्रकारांनी केला. यावर शरद पवार यांनी नकारात्मक उत्तर दिले नाही. मी त्या मेळाव्याला जाणार नाही. माझे कार्यक्रम दुसरीकडे आहेत, असे शरद पवार यांनी स्पष्ट केले. दरम्यान, महाराष्ट्रात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांत काँग्रेस ही उद्धव ठाकरे व शरद पवार यांच्याशीच युतीबाबत चर्चा करणार असल्याचे काँग्रेसचे ज्येष्ठ नेते व माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी सांगितले. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेची उद्धव सेनेशी जवळीक वाढल्याच्या मुद्द्यावर पृथ्वीराज चव्हाण म्हणाले की, हा त्यांचा घरगुती विषय आहे.

## सहा महिन्यात...

(७,६९,७३५/-) मुद्येमाल जप्त करण्यात आला आहे. जुगार (३२६) केसेसमध्ये (५६३८४०/-) मुद्येमाल जप्त करण्यात आला आहे. गांजा (७) केसेसमध्ये (९६२३३६/-) मुद्येमाल जप्त करण्यात आला आहे. गुटखा (१२) केसेसमध्ये (४३५१४९९/-) मुद्येमाल जप्त करण्यात आला आहे.अवैध धंदे बाबत ०६/२०२५ अखेर अवैध धंदे कामगिरी . अवैध दारू (१२५५) केसेसमध्ये (१,४७,८३,२२२/- रू) मुद्येमाल जप्त करण्यात आला आहे. जुगार (३८२) केसेसमध्ये (१,२५,१४,१९८/-), मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. २ गांजा (१४) केसेसमध्ये (४,७३,४०,१३६/-) मुद्येमाल जप्त करण्यात आला आहे. गुटखा (६४) केसेसमध्ये (२,२५,६४,८६४/-) मुद्येमाल जप्त करण्यात आला आहे.मकोका अंतर्गत कारवाई निरंक आहे. माहे ०६/२०२५ अखेर जिल्हयात संघटित गुन्हेगारीचा बिमोड करण्यासाठी ५ मकोका (एकुण ३६ आरोपी) कारवाया करण्यात आलेल्या आहेत. त्यापैकी ३ प्रकरणांत मा. न्यायालयात दोषारोप पत्र सादर करण्यात आले आहे जिल्हयात चझऊअंतर्गत एकुण ७ प्रस्ताव सादर केलेले होते. माहे ०६/२०२५ अखेर चझऊअंतर्गत १३ प्रस्ताव सादर केलेले असून १२ प्रस्ताव मंजूर आहेत १ प्रस्ताव अवैध शस्त्र परवाना धारकांचे ३४० परवाने रद्य करण्यासाठी मा. जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठविलेले आहेत. जिल्हयातील सर्व पोलीस ठाणे येथे प्रत्येक शनिवारी तक्रार निवारण दिन आयोजित करून नागरिकांच्या तक्रारींचा निपटारा केला जातो. दिनांक ०१/०१/२०२५ ते आजपावेतो एकुण (७०१३) तक्रारी अर्जाची निर्गती करण्यात आली आहे. बीड जिल्हयातील पोलीस दलातील अधिकारी व अंमलदार यांना प्रत्येक महिन्यातील गुन्हे आढावा बैठकीदरम्यान नवीन कायदेविषयक कार्यशाळा व विविध प्रशिक्षण देण्यात आले आहे. तसेच ख टूल्स या अधुनिक प्रणालीचा वापराबाबत मार्गदर्शन करण्यात आले आहे. नागरिकांच्या फीडबॅक साठी क्यू आर कोड कार्यान्वित – जिल्हयातील पोलीस कामकाज विषयी नागरिकांचा फीडबॅक जाणून घेणेकरीता प्रत्येक पोलीस ठाणेनिहाय टठ कोड (सुगम संवाद) सिस्टम कार्यन्वित करण्यात आली असून त्याद्वारे सर्वसामान्य नागरिकांच्या जास्तीत जास्त तक्रारींचे निराकरण करण्यात येत आहे. आजपावेतो टठ कोड प्रणाली अंतर्गत आज रोजी पावेतो एकुण ३००० व्यक्तींनी संवाद साधला असून त्यापैकी पोलीस यंत्रणेच्या कामाबद्दल २४३० व्यक्ती समाधानी म्हणजे ८१% समाधानी असल्याचा अभिप्राय दिलेला आहे. उर्वरित ५७० व्यक्तीच्या अडचणीसंदर्भात त्यांना त्यांचे मोबाईलवर संपर्क करून २४ तासात त्यांनी दिलेल्या तक्रारींचे निराकरण करण्यात आलेले आहे.

## आषाढी एकादशीला...

क्षीरसागर यांनी प्रशासनाला सूचना केल्या आहेत. श्री क्षेत्र नारायणगड येथे जिल्ह्याच्या प्रत्येक भागातून भाविक येतात. त्यांच्यासाठी सर्व आगारांतून श्री क्षेत्र नारायणगडावर जाणे-येणेसाठी दिवसभर विशेष बसेसची व्यवस्था करावी आणि श्री क्षेत्र पंढरपूरला जाण्यासाठी बीड आगारातून जादा बसेस सोडण्यात याव्यात अशा सूचना आ.क्षीरसागर यांनी एस.टी. विभागाचे विभाग नियंत्रक यांना दिल्या आहेत. श्री क्षेत्र नारायणगड येथे सुरक्षाव्यवस्था, पार्किंग, दर्शन रांग याबाबतचे नियोजन करण्याच्या पोलीस विभागाला सूचना दिल्या आहेत. तसेच श्री क्षेत्र नारायणगड येथे येणाऱ्या भाविकांना आरोग्य सुविधा पुरविण्यासाठी, आरोग्य पथकांची नेमणूक करण्याबाबतही जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा शल्यचिकित्सक यांना कळविले आहे. यासोबतच श्री क्षेत्र नारायणगड येथे ४,५,६,७ जुलै रोजी अखंडित वीजपुरवठा सेवा देण्यासाठी उपाययोजना करण्याबाबतही महावितरण मंडळाचे अधिक्षक अभियंता यांना आ.संदीप क्षीरसागर यांनी सूचित केले आहे.

## जिल्ह्यात पान...

विभागाला अनाधिकृत शाळा सापडणार का? आणि त्यांच्यावर कारवाई होणार का ? असा सवाल शिवसंग्रामचे युवा नेते तथा आरटीई कार्यकर्ते मनोज जाधव यांनी केला आहे. राज्यात मागील काही वर्षांमध्ये राज्य शासनाची कोणतीही मान्यता न घेता अनाधिकृत शाळा मोठ्या प्रमाणात सुरू झाल्या आहेत. या शाळा विद्यार्थ्यांकडून भरमसाट शुल्क वसूल करत असतात. या शाळांवर कारवाई करण्यासाठी शिक्षण संचालनालय यांनी राज्यातील सर्व जिल्ह्यात तपासण्या करण्याचे आदेश दिले आहेत. बीड जिल्ह्यात देखील बऱ्याच अनाधिकृत शाळा असल्याची भीती व्यक्त होत आहे. परंतु जिल्ह्यातील अनाधिकृत शाळांची तपासणी करून त्यावर कारवाई केली जाईल का ? असा प्रश्न विचारला जात आहे. त्यामुळे आता अधिकाऱ्यांनी शाळा तपासणी करण्याचे कागदी घोडे न नाचवता संबंधित शाळांवर कारवाईच करावी. अशीही मागणी मनोज जाधव यांनी केली आहे.

## सार्वजनिक शांतता...

₹ १००००/- वसूल करण्यात आले. तरीसुद्धा त्याचे वर्तनात सुधारणा झाली नाही.त्यास वेळोवेळी समज देऊन सुद्धा त्याने सार्वजनिक शांततेचा भंग केला. त्याचेविरुध्द गेवराई पोलीस स्टेशन येथे तिसरा गुन्हा दाखल झाल्याने त्याचेविरुध्द इछडड कलम १२९ अंतर्गत प्रतिबंधक कारवाई करीता विशेष कार्यकारी दंडाधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक बीड येथे हजर केले होते. त्यास जामीनदार देण्याची संधी दिली. परंतु तो जामीनदार देण्यास असमर्थ ठरला. त्यामुळे त्याची रवानगी बीड कारागृहात करण्याचे आदेश विशेष कार्यकारी दंडाधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक बीड यांनी केले आहेत. सदर आरोपीस दिनांक ०८/०७/२०२५ रोजी पोलीस चौकशीस हजर करणे आवश्यक असल्याचे निर्देश कारागृह प्रशासनास देण्यात आले आहेत. त्यानुसार, वरील आरोपीस दिनांक ०८/०७/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता विशेष कार्यकारी दंडाधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, बीड यांचेसमोर हजर करण्यात येणार आहे.

## लोकप्रतिनिधींनी कार्यकर्त्यांना...

आणि १२३८ या हेडखाली मंजूर झालेल्या कामांचा निधी हा वित्त विभागाकडून टप्याटप्याने दिला जातो त्यामुळे वित्तमंत्री व नियोजन मंत्री तथा पालकमंत्री बीड अजितदादा पवार यांनी यासाठी निधी मंजूर करण्यात यावा अशी मागणी डॉ.गणेश ढवळे यांनी केली आहे. ग्रामीण भागासह शहरी भागात २५१५,१२३८ या योजनूमधुन विविध विकास कामे मंजूर केली जात असतात.यासाठी लोकप्रतिनिधींकडुन या कामांच्या शिफारशी होत असतात.लोकप्रतिनिधींच्या शिफारशीनुसार मंजूर केलेली कामे पुढे वेळेत पूर्ण होताना मात्र दिसत नाहीत.या कामांमध्ये गावांतर्गत सिमेंट रस्ते,नाल्या, विद्युत पथदिवे, पेव्हर ब्लॉक आणि ईतर आवश्यक कामांचा समावेश असतो.बीड जिल्ह्यात तब्बल १२१४ कामे मंजूर करण्यात आली होती. तर मराठवाड्यात गतवर्षी २६२८ कामांना मंजुरी देण्यात आली होती. यापैकी १३३४ कामे कागदावर प्रगतीपथावर असल्याचे सांगितले जाते तर १८५ कामांच्या उद्घाटनाचे नारळ देखील फुटलेले नाहीत.

## अंबाजोगाईच्या ऊसतोड....

उंचावली आहे. व्हिएतनाम येथे नुकत्याच पार पडलेल्या एशियन चॅम्पियनशिप स्पर्धेत ४८ किलो वजनी गटात रौप्यपदक (सिल्वर मेडल) पटकावून आदित्यने जागतिक पातळीवर आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. आपल्या कुटुंबाच्या आर्थिक परिस्थितीवर मात करत अपार मेहनत, कठोर सराव आणि आत्मविश्वासाच्या जोरावर आदित्य जाधवने हे दैदिप्यमान यश मिळवले आहे. त्याची ही झेप केवळ वैयक्तिक नाही, तर लाखो गरीब घरातील तरुणांसाठी प्रेरणादायी आहे.चि आदित्यची प्रेरणा इतर तरुण घेऊन अपार मेहनत तथा कष्टाने त्यांच्यासारखेच यश संपादन करून समाजाचे त्याचबरोबर आपल्या देशाचे नाव उज्वल करतील अशी भावना राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष राजकिशोर मोदी यांनी आदित्यचा सत्कार व सन्मान करतांना व्यक्त केली. आपल्या कुटुंबाच्या आर्थिक परिस्थिती ला दोष न देता त्याने केलेल्या कष्टाचे हे फलित असल्याचे देखील राजकिशोर मोदी यांनी यावेळी स्पष्ट केले. अंबाजोगाई पिपल्स बँकेचे मुख्यालय सहकार भवन येथे नुकताच आदित्य जाधवचा शाल व फेटा बांधून सन्मान करण्यात आला.

## केज मध्ये...

पोलिसांकडून सखोल तपास सुरू असून, पीडितेच्या वैद्यकीय तपासणीसह साक्षीदारांचे जबाब नोंदवले जात आहेत.ही घटना केवळ एक गुन्हा न राहता, अशक्त आणि विशेष गरजा असणाऱ्या महिलांवर होणाऱ्या अत्याचाराचं भयावह उदाहरण बनली आहे. सामाजिक स्तरावर याचा तीव्र निषेध व्यक्त होत असून, आरोपीवर कठोरात कठोर कारवाई करण्याची मागणी होत आहे.

## सराईत चोरटा...

एक सराईत दुचाकी चोर तेलगाव रोडने बीड शहराकडे येत असल्याची माहिती स्थानिक गुन्हे शाखेला मिळाली होती. त्या आधारे तेलगाव रोडवर सापळा लावून जिवन रामदास गाडे रा. बार्शी नाका,बीड यास चोरीच्या एक दुचाकी सह ताब्यात घेतले. अधिक चौकशी केली असता आणखी पाच अशा एकूण सहा चोरीच्या दुचाकी जप्त करण्यात आल्या आहेत. यातील पाच दुचाकी संबंधित शिवाजीनगर पोलीस ठाणे येथे गुन्हे दाखल असून ते पाच गुन्हे उघडकीस आले. तर एक दुचाकी कोठून चोरी केली याचा शोध पोलीस घेत आहेत. ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांच्या केली आहे.

पान ४ वरून पुढे...

## १७ जुलै २०२५...

दि. १७ ते १८ जुलै २०२५ या कालावधीत जिल्हास्तर शालेय सुब्रतो मुखर्जी चषक फुटबॉल स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेतने २०२५-२६ मधील शालेय क्रीडा स्पर्धांचा शुभारंभ होणार आहे. सदर स्पर्धा हया १५ वर्षा खालील मुले व १७ वर्षाखालील मुले व मुली या वयोगटात होत आहेत. दि. १७ जुलै २०२५ रोजी १७ वर्षाखालील मुले व मुली तर दि. १८ जुलै २०२५ रोजी १५ वर्षाखालील मुले या वयोगटातील स्पर्धा होतील. १७ वर्षाखालील वयोगटातील खेळाडूचा जन्म दि. ०१ जानेवारी २००९ रोजी किंवा त्यानंतर जन्मलेला असावा व १५ वर्षाखालील वयोगटातील खेळाडूचा जन्म दि. ०१ जानेवारी २०११ रोजी किंवा त्यानंतर जन्मलेला असावा. स्पर्धेचे प्रवेश आणि प्रवेश शुल्क ऑफलाईन पद्धतीने दि. १६ जुलै २०२५ रोजी पर्यंत कार्यालयीन वेळेत स्विकारले जाणार आहेत. स्पर्धेतील सामने जिल्हा क्रीडा संकुल, बीडच्या मैदानावर घेण्यात येणार आहेत. जिल्हास्तर स्पर्धेनंतर विभागस्तर आणि राज्यस्तर सुब्रतो मुखर्जी चषक फुटबॉल स्पर्धा घेण्यात येणार आहेत. विभागस्तर शालेय सुब्रतो कप फुटबॉल स्पर्धा हया बीड येथे दि. २२ ते २४ जुलै २०२५ रोजी जिल्हा क्रीडा संकुल मैदान, बीड येथे होणार आहेत. विभागस्तर स्पर्धेतील वयोगट निहाय विजयी संघांना राज्यस्तर स्पर्धेत प्रवेश मिळणार आहे. जिल्हास्तरीय स्पर्धेत सहभागापुर्वीच www.subrotocup.in या संकेतस्थळावर खेळाडू व संघाची नोंदणी करणे अनिवार्य आहे. तसेच प्रत्येक सहभागी संघानी रू. २०००/- प्रवेश फी भरलेल्या नोंदणीकृत संघांनाच या स्पर्धेत सहभागी करून घेण्यात येईल. राज्यस्तर स्पर्धेतील विजेत्या संघाला सुब्रतो मुखर्जी स्पोर्टस एज्युकेशन सोसायटीतर्फे आयोजित राष्ट्रीय स्पर्धेत सहभागी होण्याची संधी मिळणार आहे. शालेय सुब्रतो मुखर्जी चषक फुटबॉल स्पर्धेच्या अधिक माहितीसाठी क्रीडा अधिकारी श्री. कालिदास होसूरकर – ९४२१५९५५१५ या भ्रमणध्वनी क्रमांकावर कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी श्री. अरविंद विद्यागर यांनी केले आहे.

## महिलेला मारहाण...

देवळाली येथे घडली असुन याप्रकरणी अंभोरा पोलिस ठाण्यात कल्पना मुंकूद वेदपाठक याच्या फिर्यादीवरून संजय शंकर कटके,मंगल संजय कटके,विठ्ठल शंकर कटके, ओंकारेश्वर चांगदेव कटके यांच्यावर अंभोरा पोलिस ठाण्यात भारतीय न्याय संहिता(बी.एन.एस)३०५(र),११५(२),३५२,,३५१(२)३२४(२),३(५) नुसार चौघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## आषाढी निमित्त...

जातात, यामध्ये रोजची ग्रुप साधना तसेच विविध कार्यक्रमांचे औचित्य साधून रक्तदान शिबीर, सत्संग, भजन असे कार्यक्रम होत असतात. गेल्या ७ वर्षापासून आषाढी एकादशीनिमित्त पायी दिंडीचे आयोजन केले जाते. यावर्षी देखील माऊलीजींच्या कृपा आशीर्वादाने बीड ते रामगड पायी दिंडीचे आयोजन करण्यात आले आहे ही दिंडी रविवारी ६ जुलै २०२५ रोजी सकाळी ६ वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौक बीड या ठिकाणाहून निघेल. शाहू नगर ,अंबिका चौक, वासनवाडी मार्गे रामगडावर ही दिंडी जाणार असून सहभागी साधकांनी पांढरा गणवेश परिधान करावयाचा असल्याचेही संयोजकांच्या वतीने सांगण्यात आले आहे. दिंडीमध्ये सहभागी साधकांसाठी ठिकठिकाणी फराळाची देखील व्यवस्था करण्यात आली आहे. अतिशय शिस्तप्रिय आणि जल्लोषा मध्ये या दिंडीचा सोहळा पार पडणार असून यामध्ये मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन ज्ञानयोग परिवार बीडच्या वतीने आले आहे.

## शिक्षक भरती....

कर्मचारी व अधिकारी यांनी सांगितला आहे की आम्ही सादिक इनामदार च्या विरोधात कोणतेही तक्रार देणार नाहीत कारण की असा प्रकार कार्यालयामध्ये घडलाच नाही शिक्षणाधिकारी प्राथमिक श्री भगवान फुलारी यांच्या जबाबोटी आमच्या स्वाक्षऱ्या घेण्यात आले आहेत माजलगाव मतदार संघाचे आमदार श्री प्रकाश दादा सोळंके साहेब यांनी बीड जिल्हा शिक्षक भरती घोटाळा प्रकरणी अधिवेशनामध्ये माझ्या तक्रारी वरती प्रश्न उपस्थित केला तसेच विधानसभेमध्ये महाराष्ट्र राज्याचे शिक्षण मंत्री श्री दादा भुसे साहेब यांनी यासाठी मार्फत चौकशी करण्याची घोषणा केली या सर्व भीतीपोटी व तक्रार परत घेण्यासाठी विविध प्रकारचे प्रयोग करत आहेत श्री भगवान फुलारी व त्यांच्या कार्यालयातील इतर कर्मचारी यांच्यामार्फत फॉर्च्यूनर मागितल्या प्रकारे बदनामी करत आहेत यांच्या कोणत्याच आमिषाला बळी न पडल्यामुळे हा प्रकार केला जात आहे या प्रकरणातील सर्व व्हिडिओचे पुरावे माझ्याकडे उपलब्ध आहेत असा प्रकार घडलाच नाही त्या ठिकाणी माहिती अधिकाऱ्याची अपील ची तारीख २७ जून देण्यात आली होती परंतु औरंगाबाद येथे महाराष्ट्रातील सर्व शिक्षणाधिकारी उपसंचालक संचालक यांची आढावा बैठक महाराष्ट्र राज्याचे शारीरिक शिक्षण मंत्री दादा भुसे साहेब व महाराष्ट्र राज्याचे प्रधान सचिव श्री रणजीत देवल साहेब व आयुक्त सचिंद्र प्रताप सिंह यांच्याकडे शिक्षण विभाग माध्यमिक बीड व प्राथमिक यांच्या बाबत तक्रार दिली व इथले सर्व प्रकरणाची हकीकत सांगितली या प्रकरणाचा दात धरून माझ्यावरती हा कटकारस्थान रचण्यात आलेला आहे खोटे गुन्हे दाखल करून बदनामी करण्याचे षडयंत्र आहे तरी या प्रकरणात तात्काळ खंडपीठ औरंगाबाद येथे दाद मागणार आहे

## आरोग्य विभागाच्या...

त्यांनी आरोग्य सेवेतील अधिकारी, कर्मचाऱ्यांना योग्य त्या सूचनाही केल्या. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.संजय राऊत, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. उल्हास गंडाळ, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ.महेशकुमार माने, जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक डॉ. अमृता मुळे, जिल्हा कार्यक्रम अधिकारी सुहास कुलकर्णी आदींसह आरोग्य विभागाचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. राऊत व डॉ. गंडाळ यांनी आरोग्य विभागांतर्गत सेवा देण्यात असलेल्या विविध सेवांचा तपशील यावेळी सादर केला. आरोग्य सेवा देत असलेले सर्व कार्यक्रम प्रमुख यांनी आपापल्या विभागातील कामकाजांबाबत सविस्तर माहिती सादर केली.

## मातृभूमी प्रतिष्ठान ....

युवराज मुरूमकर ,बीड शहर बचाव मंच चे अध्यक्ष नितीन जायभाये , लेक लाडकी अभियानाचे बाजीराव ढाकणे आदींसह बीड शहर बचाव मंच, लक्ष्मणराव जाहेर पाटील माध्यमिक विद्यालय व मराठवाडा शिक्षक संघाचे विविध पदाधिकारी शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व सामाजिक कार्यकर्ते बहुसंख्येने उपस्थित होते

## एसबीआय बँकेचा...

धनादेश यावेळी त्यांच्या कुटुंबीयांना देण्यात आला. वडवणी येथील भारतीय स्टेट बँकेत शाखाधिकारी अंकुशराव जाधव यांच्या नियोजनाखाली बँकेचा कारभार अगदी योग्य पद्धतीने चालत आहे. या बँकेच्या मार्फत शेतकरी व्यापारी तसेच नोकरदारांना योग्य सेवा दिली जाते. त्यामुळे या बँकेचे नावलौकिक मोठ्या प्रमाणात झालेले आहे. या बँकेमध्ये ७० वा वर्धापन दिनानिमित्त गेल्या आठवड्यात रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात ७० जणांनी रक्तदान केले सर्व रक्तदात्यांना बँकेच्या वतीने भेटवस्तू देण्यात आली तर या बँकेचे ग्राहक असलेले लढा दुष्काळाशी फाउंडेशनचे अध्यक्ष एडवोकेट राज पाटील यांच्या वतीने एक झाड आणि पुस्तक देऊन रक्तदात्यांचा सन्मान करण्यात आला. त्यानंतर एक जुलै हा बँकेचा वर्धापन दिन असल्यामुळे आणि याच दिवशी कृषी दिन असल्यामुळे बँकेमध्ये भव्य दिव्य वर्धापन दिन साजरा करण्यात आला. बँकेचे वयस्कर ग्राहक श्री भंडारे यांच्या हस्ते केक कापून बँकेचा सत्तरावा वाढदिवस साजरा करण्यात आला. यावेळी बँकेचे शेकडो ग्राहक उपस्थित होते. आलेल्या सर्व ग्राहकांना बँकेचे शाकाधिकारी अंकुशराव जाधव तसेच सहाय्यक शाखाधिकारी गजानन बोकारे, रवींद्र बाळासाहेब गांगर्डे , भ्रिगू पाठक, संकेत शहाणे, राज टकले, अरुण शिंदे ज्ञानेश्वर शिंदे , यांनी स्वागत केले. यावेळी बोलताना शाखाधिकारी अंकुशराव जाधव यांनी सांगितले की भारतीय स्टेट बँक ही ग्राहकांच्या सेवेमध्ये नेहमी तत्पर असते.

## आज पासून चार...

होणार असून, विशेष आकर्षण ठरणार आहे साध्वी सोनाली दिदी करपे (चकलांबा) यांचे नवनाथ कथेचे संगीतमय, रसाळ आणि सखोल निरूपण. तसेच इतर अनुभवी कीर्तनकार आपल्या कीर्तनसेवेने भाविकांना मंत्रमुग्ध करतील. ८ विशेष आकर्षण – ०६ जुलै २०२५ (आषाढी एकादशी) डॉ. रमेश घोडके व डॉ. उर्मिला घोडके यांच्या वतीने सर्व भाविकांसाठी 'फराळ प्रसादाचे' मोफत वाटप, फराळाची वेळ: सकाळी १२ ते दुपारी ३, गेल्या २० वर्षांपासून संत विचारांचा प्रचार व प्रसार करण्याचे कार्य खटोड प्रतिष्ठान सातत्याने करीत आले आहे.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

**हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे,** E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# रूपामाता नॅचरल शुगरने ऊस बिलाचे पैसे शेतकऱ्यांच्या खात्यात केले वर्ग

**• चेअरमन ॲड. व्यंकटराव गुंड यांनी दिली माहिती**

माजलगाव । प्रतिनिधी

रोषणपुरी येथील रूपामाता नॅचरल शुगरचे ऊस बिलाचे पैसे २७०० रूपयाने शेतकऱ्यांच्या खात्यात वर्ग केले आहेत यामुळे शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण दिसून येत आहे.



शेतकऱ्यांनी आपापले खाते तपासून घ्यावे मागील काही दिवसांपासून काही लोकांकडून जाणीवपूर्वक रूपामाता नॅचरल शुगरचे नाव वैयक्तिक हेतू पुरस्सर बदनाम करण्यासाठी प्रयत्न केले जात होते आणि शेतकऱ्यांचे बिले थकविल्याचे सांगून शेतकऱ्यांना चिंताग्रस्त करण्याचे काम काही लोकांकडून होताना दिसत होते कोणाच्याही भूलथापांना शेतकऱ्यांनी बळी पडू नये असे पण यावेळी सांगण्यात आले. शेतकऱ्यांच्या खात्यावर ऊस बिलाचे २७०० प्रति टणाप्रमाणे पैसे वर्ग करण्यात आलेले असून यामुळे शेतकऱ्यांनी आनंद व्यक्त केलेला आहे रूपामाता नॅचरल शुगर हे सदैव शेतकऱ्यांच्या हितासाठीच असून यामध्ये कोणाचेही पैसे बुडवण्याचा हेतू नसतो परंतु काही कारणास्तव ऊस बिल अदा करण्यासाठी विलंब झाला होता याचा फायदा घेऊन काही लोकांनी या कारखान्याचे नाव खराब करण्यासाठी अनेक प्रयत्न केले परंतु त्यांचे हे प्रयत्न असफल झालेले आहेत व ज्या शेतकऱ्यांचे ऊस बिलाचे पैसे कारखान्याकडे होते त्यांचे पैसे खात्यात वर्ग करण्यात आलेले आहेत अशी माहिती कारखान्याचे चेअरमन ॲडव्होकेट व्यंकटराव गुंड यांनी दिली आहे.माजलगाव परिसरातील शेतकऱ्यांसाठी वरदान ठरलेला रुपामाता कारखाना नेहमीच शेतकऱ्यांच्या हितासाठी काम करत असून या कारखान्याकडून कसलेही प्रकारची फसवणूक केली जाणार नाही या परिसरातील शेतकऱ्यांनी आपला ऊस आमच्या कारखान्यास देऊन सहकार्य करावे असे आवाहन चेअरमन एडवोकेट व्यंकटराव गुंड तसेच संचालक एडवोकेट अजितराव गुंड,भाऊसाहेब गुंड व कारखाना संचालक मंडळ यांनी केले आहे.

# बावी गावात कृषी दिन उत्साहात साजरा



आष्टी । प्रतिनिधी

हरित क्रांतीचे प्रणेते माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त बावी या गावात श्री छत्रपती शाहू, फुले, आंबेडकर कृषी महाविद्यालय आष्टी या कॉलेजच्या विद्यार्थी सुरज कदम, चेतन शिरस्कर ,अविनाश मुंडे ,अमन शेख, शुभम सावंत, रोहन शिंदे, रितेश शिंदे, सागर शिंदे या विद्यार्थ्यांकडून कृषी दिनाचे आयोजन करण्यात आले होते

यावेळी कृषी महाविद्यालय आष्टी येथील प्राचार्य श्री डॉ. आरसूळ .एस. आर व प्रा. तांबोळी. आय. एम (कार्यक्रम समन्वयक) ,प्रा. मिसाळ. एल. एस (कार्यक्रम अधिकारी) व बावी गावाचे सरपंच नवनाथ गर्जे उपसरपंच भरत गोल्हार व जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक अशोक लटपटे व इतर शिक्षक आणि गावातील नागरिक मोठया संख्येने उपस्थित होते.या कार्यक्रमादरम्यान कृषी दिंडी व वृक्षारोपनाचे आयोजन करण्यात आले तसेच शाळेतील विद्यार्थी हे वेगवेगळ्या वेशभूशेत उपस्थित राहिले

# घोटाळेबाज फरार असलेल्या केशव पंडितला कोणाचे बळ? प्रशांत शेलारने रातोरात बदलला दुकानाचा फलक


गेवराई । प्रतिनिधी

आपल्याकडील रकमेत वाढ होऊन ती रक्कम आपल्या कुटुंबीयांच्या कामी अशा अनेक सर्वसामान्य नागरिक फसवेगिरी करणाऱ्या बँकांच्या मोजलात अडकतात बँकेच्या फसवेकरीच्या अनेक तक्रारी वारंवार वाढत असताना यातच श्री.मंगलनाथ मल्टिपल निधी या संस्थेत ठेवी ठेवलेल्या ठेवीदारांना केशव पंडित मेंटल हॉस्पिटल ला ॲडमिट असल्याचे कारण दाखवत छत्रपती संभाजी नगर येथून जवळच्या नातेवाईकांनी त्यांना फरार केले आहे. कोणालाही या गोष्टीची खबर नसताना अचानक घडलेल्या या प्रकरणामुळे अनेक ठेवीदार अडचणीत सापडले आहेत अक्षरशः ठेविदार चिंताग्रस्त अवस्थेत होरपळून निघाले आहेत असे असताना संस्थाचालकाला



ज्या लोकांनी फरार करण्यास मदत केली त्यांची देखील चौकशी करावी अशी मागणी होत आहे.

वास्तविक पाहता खातेदारांना वेड्यात काढून संस्था बंद करण्याचा अधिकार नाही सर्व शासनाचे नियम धुडकावत गेल्या चार महिन्यापासून ही शाखा बंद आहे तसेच खातेदारांकडून बोलले जात आहे की आमच्या ठेवी अडकल्या आहेत संबंधित



बँक अधिकारी व कर्मचारी यांना फोन केला असताना काही तांत्रिक अडचणीमुळे आमची बँक बंद आहे गोरगरिबांना आर्थिक पैशाची गरज पडल्यास कोण देणार ?या संस्थेच्या कारभारावर प्रश्न उपस्थित होत असून ठेवी ठेवणाऱ्या ग्राहकांनाही विश्वास पात्र संस्थेत आपली रक्कम सुरक्षित ठेवावीच आणि या संस्थेच्या लोकांचे ठेवा अडकून पडले आहेत त्यांना आत्महत्या करण्याची वेळ आता आली आहे घोटाळेबाज श्री मंगलनाथ मल्टिपल निधी बँकेच्या चेअरमने गेल्या एक वर्षापूर्वीच फरार होण्याची प्लॅनिंगमध्ये असल्याचे खातेदारांना आता दिसून येत आहे तसेच स्वतःच्या नावे असलेली प्रॉपर्टी विक्री केली. व खोटे आश्वासनांची खैरात देऊन खातेदारांची दिशाभूल करण्याचा प्रकार वारंवार करत गेले. घराच्या रजिस्ट्रीला मेव्हणा साक्षीदार कसा ? त्यावर नामांकित संस्थेचे कर्ज असताना देखील ती प्रॉपर्टी विक्री झाली कशी ? घरातील कुटुंबाच्या सदस्यांना लग्न सोहळ्याला गेले म्हणून आधीच फरार कसे केलें ? पंडित ज्वेलर्स या नावाने असलेला फलक प्रशांत शेलार यांनी कृष्णा ज्वेलर्स या नांवाने यांनी का बदलला असावा ? एकमेकांच्या संपर्कात राहतात कसे ?

# आय एम ए अंबाजोगाई व रोटरीच्या वतीने डॉक्टर्स डे निमित्त आयोजित रक्तदान शिबिरात उत्स्फूर्त प्रतिसाद

अंबाजोगाई । प्रतिनिधी

रुग्ण व डॉक्टर यांच्यातील संवाद दृढ व्हावा यासाठी कार्यरत असणाऱ्या आयएमए संघटना शाखा अंबाजोगाई व रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटी च्या पुढाकाराने डॉक्टर्स डे च्या निमित्ताने रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले या शिबिराला उत्स्फूर्त असा प्रतिसाद मिळाला. या रक्तदान शिबिरात २६ जणांचे रक्तदान करण्यात आले. इंडियन मेडिकल असोसिएशन अंबाजोगाई, रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटी,वसुंधरा सेवा प्रतिष्ठान, जीवनदायी ब्लड बँक, भुतडा हॉस्पिटल, अंबाजोगाई क्लिनिकल लॅब संघटना , रोट्रॅक्ट क्लब अंबाजोगाई, विनोद भैय्या पोखरकर मित्रमंडळ यांच्या वतीने डॉक्टर्स डे चे औचित्य साधून रक्तदान शिबिराचे आयोजन



करण्यात आले. या शिबिराचे उद्घाटन ज्येष्ठ समाजसेवक नंदकिशोर मुंदडा( काकाजी) , आय.एम.ए चे सांस्कृतिक विभागाचे चेयरमन डॉ.राजेश इंगोले, दैनिक वार्ताचे संपादक परमेश्वर गित्ते,आय.एम.ए. अंबाजोगाईचे अध्यक्ष डॉ. नवनाथ घुगे, सचिव डॉ.उद्धव शिंदे, रोटरीच्या अध्यक्षा प्रा. रोहिणी पाठक, सचिव मंजुषा जोशी, डॉ.अनिल भुतडा,डॉ. सौ. मनिषा भुतडा, प्रोजेक्ट डायरेक्टर डॉ.सचिन पोतदार, यांच्या उपस्थितीत करण्यात आले. यावेळी झालेल्या रक्तदान शिबिरात २६ जणांनी रक्तदान केले. या प्रसंगी ज्येष्ठ डॉ.एन.पी.देशपांडे ,डॉ.ज्योती देशपांडे, डॉ शुभदा लोहिया, डॉ संदीप थोरात, डॉ अनिल भूतडा, डॉ मनीषा भूतडा, डॉ.दीपक लामतुरे, डॉ प्रल्हाद गुरव, आय एम ए चे उपाध्यक्ष डॉ विजय लाड, सचिव डॉ उद्धव शिंदे, प्रोजेक्ट डायरेक्टर डॉ सचिन पोतदार, डॉ बळीराम मुंडे, डॉ. अतुल शिंदे, डॉ. अरुणा केंद्रे, डॉ.मनिषा पवार, डॉ.प्रसाद कुलकर्णी, डॉ.विनोद जोशी, डॉ सुनील जाधव, डॉ दीपक पाटील, डॉ अमोल दहिफळे, डॉ विजय निकम, डॉ श्रीनिवास लांब, सौ संगीता नावंदर, रोटरी क्लबचे रो कल्याण काळे, रो धनराज सोळंकी, रो रमेश देशमुख, रो भीमाशंकर शिंदे, रो बालाजी घाडगे, रो जगदीश जाजू, रो गोरख बापू मुंडे, रोट्रॅक्ट क्लब च्या नूतन अध्यक्ष विशाखा बजाज, सचिव मयूर परदेशी, सर्वेश बजाज, रो मंदाकिनी गित्ते, श्री विनोद भैय्या पोखरकर, सचिन गौरशेटे, जीवनदायी ब्लड लॅबचे सूर्यकांत आघाव यांची उपस्थिती होती. आय एम ए चे अध्यक्ष डॉ.नवनाथ घुगे यांनी रक्तदान करून सुरुवात केली तर रमेश देशमुख,रोहिणी पाठक यांच्यासह अनेकांनी रक्तदान केले.

# आता शेतकऱ्यांला कृषी पंपासाठी वीज दिवसा मिळणार: आ.सुरेश धस

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी मतदार संघात मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी २.० अंतर्गत नवीन अतिरिक्त ८ सब स्टेशनला ५ व १० एम.व्ही.ए. चे ट्रांसफार्मर मतदारसंघासाठी उपलब्ध झाले असल्याने यापुढे आता कृषी पंपासाठी शेतकऱ्याला दिवसा वीज पुरवठा होणार असल्याची माहिती आ.सुरेश धस यांनी दिली याबद्दल मुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस,उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे आभार मानले आहेत. मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी २.० अंतर्गत आष्टी मतदार संघातील ८ सबस्टेशनला ५ एम.व्ही ए. चे



अतिरिक्त नवीन ट्रान्सफर मंजूर होऊन ते मतदारसंघात दाखल झाले असून या सबस्टेशनला उच्च दाबाने पुरवठा होणार आहे पारगाव जोगेश्वरी, शिराळ, टाकळी अमिया, वाहिरा, पिंपळा तसेच शिरूर तालुक्यातील मानूर टाकळी,तिंतरवणी या सबस्टेशनला अतिरिक्त ५ एम. व्ही.ए.चे तर ब्रम्हनाथ येळंब या सबस्टेशनला १० एम. व्ही.ए.चे ट्रांसफार्मर दाखल झाले आहेत. पाटोदा तालुक्यातील सबस्टेशन प्रस्तावित आहेत तेही लवकर मंजूर होतील त्यासाठी पाठपुरावा चालू आहे.

त्यामुळे शेतकऱ्याला आता दिवसा वीजपुरवठा होणार असून शेतकऱ्याचा रात्री अपरात्री शेतात जाण्याची गरज राहणार नाही त्यामुळे होणारे नैसर्गिक अपघात कमी होणार आहेत.विद्युत रोहित्र जळण्याचे प्रमाण देखील कमी होणार आहे.तसेच उच्च दाबाने पुरवठा होणार असून या योजनेअंतर्गत सोलर प्लांट उभारणार असून यातून सबस्टेशन वीजपुरवठा होणार आहे.

# भैय्यासाहेबांची लाडकी लेक राजकीय चक्रव्युहात अडकली लेकीला बदनाम करण्याचा प्रयत्न, अंतर्गत वाद चव्हाट्यावर!

गेवराई । प्रतिनिधी

तालुक्यातील राजकीयदृष्ट्या महत्त्वाचे व सर्वाधिक लोकसंख्येच्या तुलनेत मोठी असलेली धोंडराई ग्रामपंचायत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या ताब्यात आहे मात्र सदस्य व सरपंच यांच्यातील अंतर्गत वाद पुन्हा चव्हाट्यावर आला आहे मौजे.धोंडराई ग्रामपंचायत साठी घेण्यात आलेल्या सार्वत्रिक निवडणूक डिसेंबर २०२२ मध्ये थेट जनतेतून सरपंच म्हणून निवडून आलेल्या महिला सरपंच शितल अशोक साखरे त्यांच्या पक्षातूनच राजकीय विरोध पाहायला मिळत आहे.राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या लोकनियुक्त महिला सरपंच शितल



अशोक साखरे ह्या थेट जनतेतून सरपंचपदी विराजमान झाल्यानंतर धोंडराई गावाच्या विकासाचा चेहरा मोहरा बदलण्यासाठी प्रयत्नशील राहिल्या आहेत माजी सरपंचाला जे जमलं नाही ते विद्यमान सरपंच यांनी करून दाखवलंय विकास कामात सक्रियपणे काम करणाऱ्या



लोकप्रतिनिधीला अडकाठी घालण्याचा प्रयत्न तेथील ग्राम पंचायत १३सदस्य यांच्याकडून केला जात आहे त्यामुळे सरपंच शितल साखरे यांना पक्षातीलच कार्यकर्त्यांकडूनभैय्यासाहेबांची लाडकी लेक राजकीय चक्रव्युहात अडकली असल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्यात जिल्ह्याच्या राजकारणाचे सूत्र हलवणाऱ्या माजी आमदार अमरसिंह पंडित यांच्या प्रतिष्ठेला धक्का लावण्याचे काम पक्षातीलच काही लोक करत आहेत असे या अनुषंगाने दिसून आले. या वादाच्या ठिणगीत माजी मंत्री बदामरावजी पंडित व माजी आमदार लक्ष्मणराव पवार यांच्या पक्षातील कार्यकर्त्यांना येणारे काळात नक्कीच फायदा होईल असे बोलले जाते. धोंडराई ग्रामपंचायतीच्या सरपंच शितल साखरे या गेल्या दोन वर्षांपासून गावाच्या सर्वांगीण विकासासाठी झटत आहेत. अमरसिंह पंडित व आमदार विजयसिंह पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी विविध विकासकामांचा धडाका लावला आहे. मात्र, या यशाला काहींच्या डोळ्यात खुपणाऱ्या राजकीय वृत्तीचा त्रास सरपंच साखरे यांना सहन करावा लागत आहे.सर्वात दुःखाची बाब म्हणजे, शितल साखरे या ज्या पक्षाच्या नेतृत्वाखाली काम करत आहेत, त्याच पक्षातील काही कार्यकर्ते त्यांच्याविरोधात वाद निर्माण करत आहेत. गावातील काही सदस्य, जे अमरसिंह पंडित व आमदार विजयसिंह पंडित यांच्या प्रभावाखाली आहेत, तेच विकासकामांना अडथळा आणण्याचा प्रयत्न करत असल्याचे चित्र आहे.

# 'अभि नहीं तो कभी नहीं' हे लक्षात ठेवून आझाद मैदानावरील आंदोलनात बीड जिल्ह्यातील शिक्षकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे

**• बीड जिल्हा विना अनुदान शाळा कृती समितीचे आवाहन!**

बीड । प्रतिनिधी

राज्यातील विनाअनुदानित व अंशतः अनुदानित शाळांना पुढील वाढीव टप्प्यासाठी लागणारा निधी मिळावा यासाठी महाराष्ट्र राज्य विना अनुदानित शाळा कृती समिती महाराष्ट्र राज्य व शिक्षक समन्वय संघाचे ०५ जूनपासून धरणे आंदोलन सुरू आहे. तसेच बुधवार दि.०२ जुलै रोजी शिक्षक आमदार आणि पदवीधर आमदारांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन १४ ऑक्टोबर २०२४ च्या शासन आदेशानुसार निधी उपलब्ध करून द्या या मागणीचे निवेदन दिले. या वेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शिक्षक व पदवीधर आमदारा सोबत तात्काळ निधी संदर्भात बैठक







घेऊन मार्ग काढु सांगितले आहे. त्यामुळे सर्व आमदार त्यांच्या परीने प्रयत्न करीत आहेत. दुसरीकडे आंदोलनस्थळी शिक्षकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याची गरज आहे. तसेच शिक्षक समन्वयक संघाने ८ व ९ जुलै रोजी राज्यव्यापी शाळा बंद आंदोलन पुकारले आहे. या बंदमध्ये बीड जिल्ह्यातील सर्व शाळेचे संस्थाचालक, मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी शाळा बंद करून मोठ्या संख्येने आंदोलनाला उपस्थित रहावे असे आवाहन विनाअनुदानित शाळा कृती समितीचे मराठवाडा कार्याध्यक्ष वैजनाथ चाटे सर, मराठवाडा निरिक्षक विजयसिंह शिंदे सर, छत्रपती संभाजी नगर विभाग कार्याध्यक्ष जितेंद्र डोंगरे सर, मराठवाडा छत्रपती संभाजी नगर विभागाचे संघटक पंकज कळसकर सर, मराठवाडा महिला सचिव श्रीमती मुक्ता आर्डड (मोटे) मॅडम बीड जिल्हाध्यक्ष श्री आत्माराम वाव्हळ सर यांनी केले आहे.

राज्यातील अंशतः अनुदानित शिक्षकांच्या वाढीव टप्प्याच्या वेतनासाठी दिनांक १४ ऑक्टोंबर २०२४ रोजी तात्कालीन राज्य सरकारने धोरणात्मक निर्णय घेऊन या संदर्भातला शासननिर्णय ही काढला आहे. परंतु सलग नवीन सरकारचे तीन अधिवेशन झाली. या अधिवेशना दरम्यान वाढीव टप्प्यासाठी लागणाऱ्या आर्थिक निधीची तरतूद मात्र झालेली नाही. त्यामुळे हजारो शिक्षकांचा हिरमोड झाला. विनाअनुदानित अंशतः अनुदानित शाळांना पुढील वाढीव टप्पा अनुदानासाठी भरीव आर्थिक निधीची तरतूद करावी या मागणीसाठी मुंबई येथील आझाद मैदानात महाराष्ट्र राज्य विना अनुदानित शाळा कृती समिती व शिक्षक समन्वय संघाचे ०५ जूनपासून धरणे आंदोलन सुरू आहे. या आंदोलनास पाठिंबा देण्यासाठी आणि आपल्या हक्काचे वेतन पदरात पाडून घेण्यासाठी बीड जिल्ह्यातील विनाअनुदानित अंशतः अनुदानित शाळेतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन विना अनुदानित शाळा कृती समितीचे मराठवाडा कार्याध्यक्ष वैजनाथ चाटे सर, मराठवाडा निरिक्षक विजयसिंह शिंदे सर, छत्रपती संभाजी नगर विभाग कार्याध्यक्ष जितेंद्र डोंगरे सर, मराठवाडा छत्रपती संभाजी नगर विभागाचे संघटक पंकज कळसकर सर, मराठवाडा महिला सचिव श्रीमती मुक्ता आर्डड (मोटे) मॅडम बीड जिल्हाध्यक्ष श्री आत्माराम वाव्हळ सर, जिल्हा कार्याध्यक्ष श्री. प्रताप पवार सर, उपाध्यक्ष श्री. रामदास जामकर सर , उपाध्यक्ष श्री. अरविंद सौंदलकर सर, जिल्हा सचिव श्री. शेख सर जिल्हा संघटक प्रताप देशमुख सर, जिल्हा सहसंघटक श्री. बाळासाहेब नागरगोजे सर, महिला उपजिल्हा अध्यक्षा दैवशाला मुंढे मॅडम, महिला सचिव सुरेखा गायकवाड मॅडम बीड तालुका अध्यक्ष श्री. भागवत यादव सर, गेवराई तालुका अध्यक्ष श्री. दीपक गरूड सर, आष्टी तालुका अध्यक्ष श्री. रविंद्र भुकन सर,पाटोदा तालुका अध्यक्ष श्री. अंकुश गवळी सर,शिरूर तालुका अध्यक्ष श्री. दशरथ साबळे सर,माजलगाव तालुका अध्यक्ष श्री. चंद्रशेखर तौर सर, वडवणी तालुका अध्यक्ष श्री. वैजनाथ शिंदे सर ,परळी तालुका अध्यक्ष श्री गोविंद आघाव सर , धारूर तालुका अध्यक्ष श्री ज्ञानेश्वर मुंडे यांच्या सह जिल्हा विविध पदाधिकारी यांनी केले आहे.

दैनिक ● https://marathwadapatra.com
# मराठवाडा पत्र
शुक्रवार, दि.०४ जुलै २०२५ पान ४

## १७ जुलै २०२५ पासून शालेय सुब्रतो मुखर्जी चषक फुटबॉल स्पर्धेला शुभारंभ

**बीड । प्रतिनिधी**

आंतरराष्ट्रीय सुब्रतो कप फुटबॉल स्पर्धा ही एक प्रतिष्ठित आंतरराष्ट्रीय शालेय फुटबॉल स्पर्धा आहे जी भारतात नवी दिल्ली येथे आयोजित केली जाते. १९६० पासून दरवर्षी आयोजित केली जाणारी ही स्पर्धा भारतीय हवाई दलाचे एअर मार्शल सुब्रतो मुखर्जी यांच्या नावावरून ठेवण्यात आली आहे. ही भारतातील सर्वात जुनी राष्ट्रीय शालेय फुटबॉल स्पर्धा आहे आणि देशातील तळागाळात या खेळाला प्रोत्साहन देण्यासाठी ही स्पर्धा सुरू करण्यात आलेली आहे. आशियातील विविध देशांतील विद्यार्थी या स्पर्धेत भाग घेतात, ज्यामुळे ही स्पर्धा शालेय स्तरावरील सर्वात उल्लेखनिय फुटबॉल स्पर्धा आहे. सन २०२५-२६ या वर्षात जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय बीड मार्फत जिल्हा क्रीडा संकुल, बीड येथे ▶▶ उर्वरित पान २ वर

# गेवराई बाजार समितीला 'शेतकरी भवन' बांधकामास मंजुरी; आ. विजयसिंह पंडित यांच्या प्रयत्नांना यश

**गेवराई । प्रतिनिधी**



राष्ट्रसंत तुकडोजी महाराज शेतकरी भवन योजने अंतर्गत गेवराई कृषी उत्पन्न बाजार समितीच्या नवीन शेतकरी भवन बांधण्याच्या रु.१८६.३१ लक्ष रक्कमेच्या अंदाजपत्रकास शासनाने प्रशासकीय मान्यता दिली आहे. गेवराई शहरात येणाऱ्या शेतकरी बांधवांना या माध्यमातून मुक्कामाची सोय भविष्यात होणार आहे. गेवराई कृषी उत्पन्न बाजार समितीला शेतकरी भवन मंजुर व्हावे यासाठी माजी आमदार अमरसिंह पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली आ. विजयसिंह पंडित यांनी केलेल्या प्रयत्नांना यश आले आहे. बाजार समितीचे सभापती मुजीब पठाण, उपसभापती विकास सानप यांच्यासह संचालक मंडळाने दोहोंचे अभिनंदन करून आभार व्यक्त केले आहे.

मराठवाड्यातील अग्रगण्य बाजार समिती म्हणून गेवराई कृषी उत्पन्न बाजार समितीची ओळख आहे. बाजार समितीच्या कार्यक्षेत्रात माजी आमदार अमरसिंह पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली बाजार समितीने आजवर विविध उपक्रम यशस्वीरित्या राबविले आहेत. ग्रामीण भागातून येणाऱ्या शेतकऱ्यांना मुलभूत सुविधांसह गेवराई शहरात मुक्कामाची सोय व्हावी यासाठी शेतकरी भवन बांधण्याचा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित होता. शासनाच्या पणन विभागाने राष्ट्रसंत तुकडोजी महाराज शेतकरी भवन योजने अंतर्गत गेवराई कृषी उत्पन्न बाजार समितीच्या नवीन शेतकरी भवन बांधण्याच्या रु.१८६.३१ लक्ष किंमतीच्या अंदाजपत्रकास दि.१ जुलै रोजीच्या शासन निर्णयाद्वारे प्रशासकीय मान्यता दिली आहे. याकामी आ. विजयसिंह पंडित यांनी मंत्रालयीन स्तरावर पाठपुरावा केला होता.

गेवराई कृषी उत्पन्न बाजार समितीला नवीन शेतकरी भवन बांधकामास मंजुरी मिळाल्याबद्दल आ. विजयसिंह पंडित यांनी राज्याचे लोकप्रिय उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना. अजितदादा पवार, पणन मंत्री ना. जयकुमार रावल यांचे आभार व्यक्त केले आहे. कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कार्यक्षेत्रातील शेतकरी बांधवांना मुक्कामाची सुविधा उपलब्ध करून दिल्याबद्दल सभापती मुजीब पठाण, उपसभापती विकास सानप यांच्यासह संचालक मंडळाने माजी आमदार अमरसिंह पंडित आणि आ. विजयसिंह पंडित यांचे अभिनंदन करून आभार व्यक्त केले आहे. गेवराई शहरालगत बाजार समितीच्या व्यापारी संकुला लगत लवकरच शेतकरी भवनाची देखणी वास्तू उभारली जाणार आहे. यामध्ये शेतकऱ्यांच्या मुक्कामासह आवश्यक मुलभूत सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. शेतकरी भवनाला मंजुरी मिळाल्याबद्दल गेवराई तालुक्यातील शेतकरी बांधवांनी आनंद व्यक्त केला आहे.

## थोडक्यात

### बेग अमीर बी यांनी मिळवली पी. एच. डी डॉक्टरेट
#### माळापुरी गावासाठी ठरल्या प्रेरणास्थान

**माळापुरी । प्रतिनिधी**



येथील सेवानिवृत्त इमाम मिर्झा अब्दुल अझीज बेग यांची मुलगी बेग अमीर बी यांनी माध्यमिक शाळेतील शिक्षकांमध्ये मानवी हक्कांच्या मूल्यांच्या विकासाचा अभ्यास या विषयावर पी.एच.डी डॉक्टरेट मिळवली आहे. माळापुरी गावातून पी.एच.डी डॉक्टरेट मिळवणाऱ्या त्या पहिली महिला असल्याने गावासाठी प्रेरणा स्थान ठरल्या आहे. असे की,माळापुरी येथील मूळचे रहिवासी आणि कतर देशातील मस्जिदचे सेवानिवृत्त इमाम आणि इस्लामिक विद्वान मिर्झा अब्दुल अझीज बेग यांची मुलगी बेग अमीर बी यांना शिक्षण विद्या शाखेतून (षरर्लीश्रीू ष शर्वीलरींळेप) माध्यमिक शाळेतील शिक्षकांमध्ये मानवी हक्कांच्या मूल्यांच्या विकासाचा अभ्यास या विषयावर दि.२७ जून २०२५ रोजी पी.एच.डी डॉक्टरेट प्रदान करण्यात आली आहे.त्यांच्या या कार्यात छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) येथील डी.एस.आर. कॉलेज ऑफ एज्युकेशनचे प्राचार्य डॉ.एजाज अली यांचे अमूल्य असे मार्गदर्शन राहिले आहे.बेग अमीर बी यांनी मिळविलेली पी.एच.डी डॉक्टरेट माळापुरी गावासाठी ऐतिहासिक यश ठरले असून बेग अमीर बी ह्या माळापुरी गावातून पी.एच.डी डॉक्टरेट मिळवणाऱ्या पहिली महिला असल्याने त्या गावासाठी प्रेरणास्थान ठरल्या आहेत.यावेळी बेग अमीर बी यांचे वडील मिर्झा अब्दुल अझीज बेग यांनी आपल्या मुलीच्या यशाबद्दल अपार आनंद व्यक्त केला असून सर्व नातेवाईक आणि गावकऱ्यांनी बेग अमीर बी यांना शुभेच्छा दिल्या.

### आज पासून चार दिवस रंगणार आषाढी महोत्सव संगीतमय कथा व सांप्रदायिक कीर्तने



**बीड । प्रतिनिधी**

आषाढी एकादशीनिमित्त संपूर्ण महाराष्ट्रात आणि देशभरात भक्तिमय वातावरण अनुभवायला मिळते. पंढरपूरची वारी गाठता न आलेल्या भाविकांसाठी बीडमध्येही अध्यात्मिक वातावरणाची अनुभूती यावी, या हेतूने स्वर्गीय झुंबरलालजी खटोड सामाजिक प्रतिष्ठान, बीड यांच्या वतीने नवनाथ कथा व सांप्रदायिक कीर्तन सोहळ्याचे आयोजन दिनांक ४ जुलै ते ७ जुलै २०२५ दरम्यान करण्यात आले आहे. हे चार दिवसीय भक्तिमय आयोजन बीड येथील खटोड प्लाझा, वृंदावन गार्डनजवळ, एमआयडीसी रोड येथे पार पडणार आहे. या सोहळ्यात महाराष्ट्रातील नामवंत कथाकार व कीर्तनकार सहभागी ▶▶ उर्वरित पान २ वर

## महिलेला मारहाण करत घराचा कडी-कोंडा तोडून 30 हजार लांबविले!

**● अंभोरा ठाणे हद्दीतील देवळाली येथील घटना**

**बीड । प्रतिनिधी**



बुधवारी दुपारच्या दरम्यान घरासमोरील शेतात काम करत असताना येथील एकाच कुटुंबातील चौघांनी येऊन जुन्या भांडणांची कुरापत काढून लाथाबुक्यांनी मारहाण करत ,शिवीगाळ करून,जिवे मारण्याची धमकी देत,बंद घराचा कडी,कोंडा तोडून आत घुसून संसारउपयोगी वस्तुची नासधूस करत घर खर्चासाठी ठेवलेले रोख ३० हजार रूपये घेऊन गेल्याची घटना २ जुलै रोजी दुपारच्या दरम्यान घडली.या प्रकरणी अंभोरा पोलिस ठाण्यात चौघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आष्टी तालुक्यातील देवळाली (पानाची) येथील कल्पना मुंकूद वेदपाठक या दुपारच्या दरम्यान स्वताच्या घरासमोरील शेतात काम करत असताना येथील चौघांनी त्याच्या घरी घेऊन जुन्या भांडणाची कुरापत काढून लाथा,बुक्यांनी मारहाण करत, मला व माझ्या जावाला शिवीगाळ करून ,जिवे मारण्याची धमकी देत घराचा कडी,कोंडा तोडून साहित्यांची नासधूस करत घर खर्चासाठी ठेवलेला ३० हजार रूपये घेऊन गेल्याची घटना ▶▶ उर्वरित पान २ वर

## आषाढी निमित्त ज्ञानयोगाची बीड ते रामगड पायी दिंडी

**बीड । प्रतिनिधी**



दरवर्षी प्रमाणे याहीवर्षी प.पु.माऊलीजी यांच्या कृपाशिर्वादाने आषाढी एकादशी निमित्त ज्ञानयोग प्रतिष्ठान बीड परिवाराच्या वतीने रविवारी (दि.६ जुलै) बीड ते रामगड पायी दिंडीचे आयोजन करण्यात आले आहे. या प्रसंगी सर्वांनी सहपरिवार उपस्थित रहावे असे आवाहन करण्यात आले आहे.

ज्ञानयोग प्रतिष्ठान छत्रपती संभाजीनगर या संस्थेच्या वतीने संपूर्ण महाराष्ट्र, देश आणि आता विदेशामध्ये सुध्दा ज्ञानयोगाची पताका फडकू लागली आहे. साधना शिबीर, ध्यान शिबीर, ट्रेकिंग आणि बाल शिबिरांच्या माध्यमातून ज्ञानयोग आता सातासमुद्रापार गेला आहे. बीड शहरामध्ये सुद्धा आता हजारोंच्या संख्येने साधक वर्ग झाला आहे. बीड ज्ञानयोग परिवाराच्या वतीने देखील विविध उपक्रम नेहमी राबविले ▶▶ उर्वरित पान २ वर

## शिक्षक भरती घोटाळ्याप्रकरणांमध्ये तक्रार परत घेण्यासाठी अनेक दिवसापासून सादिक इनामदार यांच्या विरुद्ध खोट्या तक्रारी दाखल

**बीड । प्रतिनिधी**



शिक्षक भरती घोटाळ्याप्रकरणांमध्ये तक्रार परत घेण्यासाठी मागील अनेक दिवसापासून सादिक इनामदार यांच्या विरुद्ध खोट्या तक्रारी दाखल करणार आहेत या प्रकरणात पोलिस अधीक्षक बीड मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड यांना यापूर्वीच लेखी स्वरुपात कल्पना देण्यात आली होती काल माहिती अधिकाऱ्याची अपील सुनावणीची तारीख रद्द झाल्यानंतर नंतरची तारीख घेण्यासाठी कार्यालयामध्ये गेल्यानंतर तुम्ही दिलेली शिक्षक भरती घोटाळ्याची तक्रार परत घ्या तुमच्यामुळे शिक्षण विभागाची प्रतिमा मलिन झालेली आहे असे शिक्षण अधिकारी श्रीमती पाटील मॅडम म्हणाल्या तसेच शिक्षणाधिकारी प्राथमिक श्री भगवान फुलारी कार्यालयाने अधीक्षक श्री रंगनाथ राऊत व लिपिक भेंडेकर व प्रभारी गटशिक्षणाधिकारी केज श्री लक्ष्मण बेडस्कर फुलारी शिक्षणाधिकारी यांचा आर्थिक कारभार बघणारे यांनी मला मागील अनेक दिवसापासून खोट्या गुन्ह्यात अडकवणार आहेत यापूर्वीही प्रयत्न केला होता परंतु माझ्याकडे त्यांचे सर्व व्हिडिओ पुरावे असल्यामुळे ते माझ्या विरोधात गुन्हा दाखल करू शकले नाहीत व त्यांच्याच कार्यालयातील इतर ▶▶ उर्वरित पान २ वर

## आरोग्य विभागाच्या विविध सेवांचा जिल्हाधिकारी यांनी घेतला आढावा

**बीड । प्रतिनिधी**



बीड जिल्ह्यातील राष्ट्रीय एड्स प्रतिबंध व नियंत्रण, राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण, राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण, पीसीपीएनडीटी, फ्लोरेसीस, मौखिक आरोग्य या आरोग्य विभागांच्या कार्यक्रमांसह, रुग्ण कल्याण समिती, १०८ रुग्णवाहिका, महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य, आयुष्यमान भारत आदी योजना, आरोग्य विभागाकडून रुग्णांना देण्यात येणाऱ्या सेवांचा आढावा जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी आज घेतला. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रगती सभागृहात हा आढावा घेण्यात आला. यावेळी ▶▶ उर्वरित पान २ वर

## मातृभूमी प्रतिष्ठान कडून मुख्याध्यापक कालिदास धपाटे सन्मानित

**बीड । प्रतिनिधी**



बीड तालुक्यातील नामलगाव फाटा येथील लक्ष्मणराव जाहेर पाटील माध्यमिक विद्यालयाचे आदर्श मुख्याध्यापक कालिदास धपाटे यांचा सेवापुर्ती सोहळा मंगळवार दि.१ जुलै २०२५ रोजी मराठवाडा शिक्षक संघ यांच्या वतीने यशवंत विद्यालय कॅनाल रोड , बीड येथे विविध सामाजिक ,शैक्षणिक समस्यावर तज्ञ व्यक्तींच्या सविस्तर मार्गदर्शनाने मोठ्या उत्साहाच्या वातावरणात संपन्न झाला. यावेळी मातृभूमी प्रतिष्ठानच्या वतीने प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. संजय तांदळे, मातोश्री विद्यालयाचे मुख्याध्यापक बाळासाहेब नागरगोजे यांच्या हस्ते पुष्पगुच्छ व सन्मानपत्र देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी मुख्याध्यापक राजकुमार कदम, गणेश वाघ, दत्तात्रय चव्हाण, प्राचार्य डी जी तांदळे, उत्तमराव सानप, नामदेव चव्हाण, बाबा बडे, जे एम पैठणे, गणेश आजबे, ▶▶ उर्वरित पान २ वर

## ई-पीक पाहणीस ०६ जुलैपर्यंत मुदतवाढ

**बीड । प्रतिनिधी**

शेतकऱ्यांना ई-पीक पाहणी करण्यात येत असलेल्या अडचणीच्या पार्श्वभूमीवर उन्हाळी हंगाम २०२४-२५ करीता सहायक स्तरावरील ई-पीक पाहणीसाठी ०६ जुलैपर्यंत अंतिम मुदतवाढ देण्यात आली आहे, असे निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी कळवले आहे. ई-पीक पाहणीची प्रक्रिया वेळेत, अचूकपणे पूर्ण होणे आवश्यक आहे. मंडळ अधिकारी यांना मोबाईल पद्वारे पीक दुरूस्तीसाठी २१ जुलैपर्यंत अंतिम मुदतवाढ देण्यात आलेली आहे, असेही त्यांनी कळवले आहे.

# एसबीआय बँकेचा ७०, वा वर्धापन दिन वडवणीत साजरा

**मयत खातेदाराच्या वारसाला दिला दोन लाखाचा धनादेश; शाखाधिकारी अंकुशराव जाधव यांच्या नियोजनातून कार्यक्रम यशस्वी**

**वडवणी । प्रतिनिधी**



भारतीय स्टेट बँक संपूर्ण भारत देशामध्ये नावाजलेली बँक आहे. या बँकेचे कोट्यावधी ग्राहक असून बँक विश्वासार्हतेच्या बळावर आजही नावलौकिक करत आहे. या बँकेचा सत्तरावा वर्धापन दिन वडवणी येथील एसबीआयच्या शाखेमध्ये साजरा करण्यात आला. बँकेच्या वतीने गेल्या आठवड्यात भव्य दिव्य रक्तदान शिबिर घेण्यात आले होते. तर एक जुलै या कर्षिदिनी बँकेचे ग्राहकाच्या हस्ते केक कापून बँकेचा ७० वा वाढदिवस साजरा करण्यात आला. बँकेचे शाकाधिकारी अंकुशराव जाधव आणि इतर सर्व अधिकारी कर्मचाऱ्यांनी उपस्थित सर्व ग्राहक शेतकरी बांधवांना यावेळी शुभेच्छा दिल्या तर बँकेचा एका खातेदार ग्राहकाचा मृत्यू झाला होता त्या ग्राहकाचा विमा उतरला असल्यामुळे दोन लाखाचा ▶▶ उर्वरित पान २ वर

**● श्री. सहाय्यक व्यवस्थापक गजानन बोखारे यांच्या कार्यक्षमतेचे सर्वत्र कौतुक**

श्री. गजानन बोखारे, सहाय्यक व्यवस्थापक या पदावर कार्यरत असलेले अधिकारी, यांनी त्यांच्या कर्तव्यदक्षतेने, सकारात्मक दृष्टिकोनाने आणि उत्कृष्ट नेतृत्वगुणांनी आपली वेगळी छाप निर्माण केली आहे. कार्यालयीन कामकाजातील अचूकता, वेळेचे नियोजन व सहकाऱ्यांशी समन्वय यामुळे त्यांच्या कार्यपद्धतीचे सर्व स्तरांवर कौतुक होत आहे. त्यांच्या अथक परिश्रमांना आणि कार्यक्षमतेला दिलेली ही पावती त्यांच्यासाठी निश्चितच प्रेरणादायी ठरेल आणि इतरांसाठी आदर्श ठरेल.

